# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 28.09.2012 (का.प.क्र.14) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 28.09.2012 (का.प.क्र.14) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम, प्र.नगर सचिव तथा विधी सहाय्यक श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
05. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
06. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
07. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
08. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
09. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर

**चर्चा :**

**मा.सभापती** :ॲक्शनपॉईट बाबत खुलासा करण्यात यावा. मुद्दा क्रमांक 1 गणेश उत्सव संदर्भात वार्ड वाईज ॲक्शन प्लॅन तयार करणे.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :क्रांतीनगर, ज्योतीनगर, विश्वभारती कॉलनी येथील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याकरीता मा.आयुक्तांचे विशेष अधिकार वापरून पॅचवर्क करण्याचे आदेशित केले होते. परंतु 2.75 कोटींचे टेंडर ठेवण्यात आले. परंतु अद्यापर्यंत खड्डे बुजविण्यात आलेले नाही. रस्त्यांवरील लाईटही बंद अवस्थेत आहे. तात्काळ खड्डे बुजविले गेले नाही तर गंभीर परिणामाला सामोरे जावे लागेल.

**मा.सभापती** :आठ दिवसापुर्वी गणेश उत्सव विसर्जनापुर्वीच्या मार्गाचे पॅचवर्क करण्यात यावे म्हणुन आदेशित केलेले होते. स.सदस्य श्री.गिरजाराम हाळनोर यांच्या वार्डातील काम तात्काळ करण्यात यावे.

**शहर अभियंता** :शहरातील प्रमुख मार्गातील खड्डे बुजविण्याचे/पॅचवर्क करण्याचे काम करण्यात आलेले आहे.

**मा.सभापती** :प्रत्येक प्रभागाला एक गुत्तेदार याप्रमाणात नियोजन केलेले आहे.

**शहर अभियंता** :नियोजन केलेले आहे. काम सुरू झालेले आहे. स.सदस्यांनी ज्या रस्त्यांचा उल्लेख केलेला आहे. त्या बाबतचे काम तात्काळ सुरू करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हळनोर** :घाईगडबडीमध्ये काम केल्याने ते काम योग्यरित्या होत नाही. स्थायी समितीचे स.सदस्य पॅचवर्कची पहाणी करतील त्यानंतर संबधीत गुत्तेदाराचे बिल अदा करण्यात यावे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :काल्डा कॉर्नर, पद्मावती हॉस्पीटलच्या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडलेले आहे. जवाहर कॉलनी परिसरातील जनता गणेश विर्सजनासाठी याच रस्त्यांने जात असतात तेथील खड्डे बुजविण्यात यावे.

**मा.सभापती** :प्रभाग अभियंता, कार्यकारी अभियंता आणि पाणीपुरवठा उपअभियंता यांनी मिळुन काम केले पाहिजे.

ॲक्शन पॉइंट क्रमांक 2

स्थायी समिती सभेसाठी स्वतंत्र लघुलेखक/लघुटंकलेखक देणे संबधी नगर सचिव यांनी मा.आयुक्तांशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावावा.

**उपआयुक्त(प्र) तथा नगर सचिव** :या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा करण्यात आलेली आहे. नगर सचिव विभागातील लिपीक श्री.मनोज मारवाडे लघुलेखकाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. परंतु नगर सचिव विभागातर्फे अशी विनंती करण्यात येते की, नगर सचिव विभागास एका स्टेनोची अत्यंत आवश्यकता असुन गेली चार वर्ष या पदाचा कार्यभार संबधीत कर्मचारी पहात असल्याने श्री.मनोज मारवाडे यांनाच अतिरिक्त कार्यभार न देता लघुलेखक/लघुटंकलेखक या पदावर कायम करण्यात यावे. जेणे करून इतिवृत्त नियमित व वेळेवर देण्यात येतील. तसेच झ ाालेल्या चर्चेप्रमाणे 9 इतिवृत्त देण्यात आलेले आहेत. उर्वरित इतिवृत्त लवकर देण्यात येतील.

**मा.सभापती** :ॲक्शन पॉइंट क्रमांक 2 स.सदस्य श्री.गिरजाराम हळनोर यांचे वार्डातील पेव्हर ब्लॉकचे काम तात्काळ करणे

**कार्यकारी अभियंता(श्री.सिकंदर)** :काम चालु करण्यात आलेले आहे.

**मा.सभापती** :शहरातील अतिक्रमणबाबत खुलासा करण्यात यावा.

**प्रशासकीय अधिकारी** :शहरातील अतिक्रमणबाबतची माहिती वार्डवाईझ तयार करण्यात आलेली आहे. वार्ड अ मध्ये अनाधिकृत बांधकाम 21 ब-60 क-44 ड-14 इ-166 एफ-53 या सर्वांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

**मा.सभापती** :याबाबतची सविस्तर माहिती सभागृहाला देण्यात यावी.

धन्वंतरी भागातील लाईट तात्काळ सुरू करणे.

**उपअभियंता (विद्युत)** :फिटींग लावण्यात आलेल्या आहेत. लाईट सर्व सुरू करण्यात येईल.

**श्री.रेणुकादास वैद्य** :सर्वच्या सर्व 6 लाईट फिटींग बंद आहेत. लाईट बंद अवस्थेत आहे.

**उपअभियंता (विद्युत)** :उड्डाणपुलावरील लाईटचे 80 टक्के काम झालेले आहेत.

**मा.सभापती** :शिवाजी नगर येथील वॉल कंम्पाऊंडचे काम करणे.

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता(बिओटी) | :शिवाजीनगर येथील वॉल कम्पाऊंडचे कामा संदर्भातील संचिका प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आलेली आहे. मंजूरी मिळाल्यास टेंडर कॉल करण्यात येईल. |
| श्री.नारायण कुचे | :वर्तमानपत्रामध्ये रमेश नागपाल भोगवटा प्रमाणपत्राबाबत बातमी आलेल्या आहेत. याबाबतीत खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| उपअभियंता(न.र.वि.) | :मनपातर्फे प्रमाणपत्र इश्यु केलेले आहे. |
| श्री.नारायण कुचे | :मनपाची एनओसी होती का? वर्तमानपत्रामध्ये चुकीची बातमी आली का? माहिती देण्यात यावी. या अगोदर किती प्रमाणपत्र दिलेत. |
| उपअभियंता(न.र.वि.) | :यासंबधी सहाय्यक संचालक नगर रचना यांनी अहवाल दिला आहे. |
| श्री.नारायण कुचे | :वर्तमानपत्रामध्ये आलेली बातमी चुकीची आहे का बरोबर आहे? सभागृहात झालेल्या चर्चेमध्ये काहीही निष्पन्न होत नाही. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :वर्तमानपत्रामध्ये अशा स्वरूपाच्या बातम्या आल्यामुळे मनपाची बदनामी होते. प्रमाणपत्र बरोबर आहे, चुकीचे आहे याबाबतीत संबधीत विभागाने वर्तमानपत्राला खुलासा देणे अपेक्षित आहे. |
| श्री.नारायण कुचे | :आजपर्यंत किती भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले याबाबतची माहिती पुढील सभेपर्यंत देण्यात यावी. |
| मा.सभापती | :या विषयी किती प्रमाणपत्र इश्यु केलेले आहे. याबाबतची माहिती पुढील सभेत देण्यात यावी. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :शहरात जागोजागी कचऱ्याचे ढिग पडलेले आहेत. भाडयाने कित्येक वाहने लावलेली आहेत. परंतु कचरा उचलला जातो की नाही या प्रश्न निर्माण होतो. कचऱ्याचे मोजमाप कसे आहे याबाबतची माहिती देण्यात यावी. |
| उपअभियंता (यांत्रिकी) | :कचरा उचलण्यासाठी वार्ड वाईज माहिती पुढील प्रमाणे आहेत.<br>वार्ड अ- मनपाचे 6 आणि खाजगी ट्रक 4, 1 स्कीप लोडर =11<br>वार्ड ब- मनपाचे 5 आणि खाजगी ट्रॅक्टर 12, 1 स्कीप लोडर=18<br>वार्ड क- मनपाचे 4 आणि खाजगी ट्रक 5, 1 स्कीप लोडर=10<br>वार्ड ड- मनपाचे 4 आणि खाजगी ट्रक 5, 1 स्कीप लोडर=10<br>वार्ड इ- मनपाचे 5 आणि खाजगी ट्रक 5, 1 स्कीप लोडर-11<br>वार्ड फ- मनपाचे 4 आणि खाजगी ट्रक 5, 1 स्कीप लोडर =10 |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :भाडे कशा पध्दतीने दिले जाते. |
| उपअभियंता (यांत्रिकी) | :रोज प्रमाणे भाडे दिले जाते. कमीत कमी दोन ट्रिप दररोज माराव्यात. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :वाहने एका ट्रिपमध्ये कचरा घेऊन जातात परंतु दुसऱ्या ट्रिपमध्ये कचरा घेऊन जात नाही. |
| उपअभियंता (यांत्रिकी) | :वार्ड ऑफिसरच्या मागणीप्रमाणे वाहने पुरवली जातात. |
| मा.सभापती | :मागणीप्रमाणे पुरवठा केला जातो तर शहर स्वच्छ का राहत नाही. |

| | |
|---|---|
| श्री.बाळासाहेब मुंडे | :ट्रिपमध्ये कमीजास्त कचरा घेऊन जातो याबाबतची शाहनिशा कोण करतो. |
| उपअभियंता(यांत्रिकी) | :लॉगबुक रोजच्या रोज मेंन्टेंन असते. एस.आय. आणि वार्ड ऑफिसर यांचेद्वारे सर्टीफाय केले जाते. अहवाल आल्याशिवाय पेमेंट अदा केले जात नाही. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :रोजचा अहवाल दाखविण्यात यावा. |
| उपअभियंता(यांत्रिकी) | :वॉर्ड ऑफिसरकडे रोजचा अहवाल दिला जातो. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :वार्ड वाईज कचरा किती उचलला आहे सांगण्यात यावे. माझ्या वार्डात गुंठेवारी भागात रोजच्या सरासरी दोनच 407च्या ट्रिप जात आहे. वाहनांची संख्या पाहता कचरा शहरात शोधावा लागेल. बिलापुरती फक्त नोंद केली जाते. माझ्याकडे सिडी तयार केलेली आहे. कचरा उचलुन डायरेक्ट डंम्पींगला जातो. |
| मा.सभापती | :ॲव्हरेज किती आहे. रोज दोन ट्रिप केल्या जातात का? |
| उपअभियंता(यांत्रिकी) | :दोन ट्रिप केल्या जातात काही ट्रक सिंगल ट्रिप करतात असा अहवाल आलेला आहे. आवश्यकते प्रमाणे वाहने पुरविण्यात आलेली आहे. वार्ड ऑफिसर आणि घनकचरा प्रमुख यांनी त्यांच्या लेवलवर नियोजन करावे. |
| मा.सभापती | :किती पेमेंट अदा केले जाते् |
| उपअभियंता(यांत्रिकी) | :खाजगी वाहनांवर महिण्याला साधारणत: 25 लाख रूपयांचे पेमेंट अदा केले जाते. वर्षाला 3 कोटी रूपये अदा केले जाणार आहे. साधारणत: 9 महिण्यांपासून हा प्रोजेक्ट चालवला जात आहे. |
| मा.सभापती | :एवढे वाहने लावल्यावरही शहरात कचरा का दिसतो? |
| उपअभियंता (यांत्रिकी | :वाहनांनवर आवश्यक ते मजूर दिल्यास प्रश्न सुटू शकेल. |
| मा.सभापती | :वाहने लावण्यापुर्वी काही प्लॅनिंग केली नाही का? कचऱ्याच्या वजनावर वाहने का लावण्यात येत नाही. जेवढे जास्त वजन तेवढे जास्त पैसे. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :वजनावर कचरा उचलला गेला तर कचरा शोधावा लागेल. |
| मा.सभापती | :कचऱ्याच्या वजनावर पेमेंट अदा केले पाहिजे. |
| उपअभियंता (यांत्रिकी) | :मनपाकडे काटा नाही. खाजगी स्वरूपातुन हे काम करावे लागेल. 50 रूपये दर आहे. |
| मा.सभापती | :वजनावर कचरा उचलल्यावर फरक पडेल शहरात कचरा आढळुन येणार नाही. कचऱ्यासह दगड,मातीही गोळा केली जाईल. |
| श्री.नारायण कुचे | :ट्रिपचे काही नियोजन असेल. |
| उपअभियंता(यांत्रिकी) | :साधारणत: 8 ते 9 तास काम करावे व कमीत कमी दोन ट्रिप मारायला हव्या. |
| श्री.नारायण कुचे | :वार्ड ब मध्ये 12 ट्रॅक्टर आहेत. एकुण वाहने 18 आहेत तरीही कचरा आढळुन येतो. प्रशासनाचा निष्काळजीपणा आहे. |
| उपअभियंता(यांत्रिकी) | :मनपाच्या 15 आणि खाजगी 21 रिक्शा लावण्यात आलेल्या आहेत. |

| | |
|---|---|
| श्री.नारायण कुचे | :याबाबतीतचा सखोल अभ्यास करून निर्णय देण्यात यावा. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :16 वार्डासाठी 10 वाहने ही कमी पडत आहे. त्यात वाहने फक्त एकच ट्रिप मारली जाते. तांत्रिक अडचणी अशी आहे की, डंम्पच्या ठिकाणी ट्रक कचऱ्याने भरून नेला जातो ज्या ठिकाणी कचरा टाकायचा आहे तेथे लेबर कुणी द्यायचे त्याचे नियोजन कुणी करायचे. कचरा भरण्याची जबाबदारी कुणाची? वजनावर पेमेंट अदा करण्यात यावे. |
| उपअभियंता(यांत्रिकी) | :सभागृहाने सुचविलेला प्रस्ताव योग्य आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :ट्रकमधील कचरा एकदा मोजणी केल्यावर मोजणीच्या आधारावर नंतर कचऱ्याचे वजन ठरविता येईल. ट्रिपद्वारे कचरा योग्य पध्दतीने उचलला जात नाही. परंतु पेमेंट अदा केले जाते. सोलापुर महानगरपालिकेत वजनावर कचरा उचलला जातो. त्याठिकाणी कचरा सापडत नाही. या ठिकाची कचऱ्याचे योग्य प्रमाणात नियोजन करण्यात यावे. प्रशासनाची जबाबदारी आहे. वजनावर कचरा उचलण्याचे नियोजन करण्यात यावे. अशा पध्दतीचा प्रस्ताव संबधीत विभागाकडुन आणण्यात यावा. |
| मा.सभापती | :वजनावर कचरा उचलण्यामुळे शहर स्वच्छ होण्यास मदत मिळेल. रस्त्यामधील रस्त्याच्या बाजुला असलेले दगड माती वजन जास्त भरण्यासाठी उचलण्यात येईल त्यामुळे एक प्रकारे शहर स्वच्छ होण्यास मदतच मिळेल. वजन करतांना मनपाचे अधिकारी/कर्मचारी त्या ठिकाणी तपासणीसाठी असायला हवे. |
| आरोग्य वैद्यकीय अधिकारी | :जुन जुलैमध्ये वजनावर कचरा उचलण्याचा प्रयत्न केला होता. त्या काळात जास्तीत जास्त कचरा उचलला गेला होता. 400 ते 450 मॅट्रीकटन कचरा गोळा करण्यात येत होता. वजनावरचा प्रस्ताव योग्य आहे. |
| मा.सभापती | :सभागृहाचे अभिनंदन सभागृहाने प्रशासनाला चांगला प्रस्ताव सुचविलेला आहे. प्रशासनाने प्रस्ताव आणण्याबाबतीत ताबडतोब कार्यवाही करावी. प्रशासनाच्या माध्यमातुन प्रस्ताव ठेवण्यता यावा. |
| शहर अभियंता | :आज जे काम चालू आहे ते कामही त्याच धर्तीवर चालु करता येईल. वार्डामध्ये ट्रक लावलेल्या आहेत त्या ट्रकच्या माध्यमातुन वार्ड अधिकारी यांनी तिन ट्रिप करून घेतल्याच पाहिजे. त्यांच्या अडचणी म्हणजे त्यांचेकडे लेबर नाहीत. एका गाडीला एक ट्रिप करण्यासाठी चार तास लागतात. लेबर वाढविल्यास जास्त ट्रिप होतील आणि शहरही स्वच्छ राहील. |
| मा.सभापती | :विथ लेबर/कर्मचारी देण्यात येतील. |
| कार्यकारी अभियंता(बिओटी) | :देशात अनेक ठिकाणी अशा प्रकारे कचरा उचलला जातो. चांगला प्रस्ताव आहे. वेट करणारा अधिकारी सक्षम असायला हवा. |
| मा.सभापती | :वजन करत असतांना सक्षम अधिकारी त्या ठिकाणी असायला हवा. एका महिण्यामध्ये प्रस्ताव मांडण्यात यावा. |

**श्री.गिरजाराम हळनोर** :शहरात डासांची संख्या वाढलेली आहे. प्रशासनाने डास निर्मुलनासाठी कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत.

**श्री.रेणुकादास वैद्य** :100 फॉगिग मशीन गोदामात पडुन आहेत. दुरूस्त करण्याबाबतीत याचा अहवाला बाबत मागणी केली होती. परंतु लेखी पत्र देऊनही उत्तर अप्राप्त आहे. मनपाच्या मॅनपॉवर वापरून डास निर्मुलन करण्यात यावे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** :अर्बन मलेरिया स्टिंग हि शासनाची स्किम मनपामध्ये राबविण्यात येते. शासनाकडुन अनुदान प्राप्त होते. अनुदानित 68 कर्मचारी काम करतात आणि विनाअनुदानित 48 कर्मचारी मलेरिया प्रतिबंद योजनेसाठी काम करतात. सिडकोच्या खाजगीकरणातुन 42 कर्मचारी काम करतात. स्प्रे पंप 100 असुन त्यापैकी 97 वर्कींगमध्ये आहे आणि 03 नादुरूस्त आहेत. एकुण 32 फॉगीग मशिन आहेत. सिडको खाजगीकरणाचे 06 मशिन आहेत. 38 पैकी 21 वर्कींगमध्ये आहेत आणि 17 वर्कींगमध्ये नाहीत. तत्कालिन आरोग्य वैद्यकीय अधिकारी श्री.देवगांवकर यांनी मशीन दुरूस्तीसाठी पुण्यापर्यंत पाठविण्यात आले होते परंतु मशीन दुरूस्त होत नाहीत. खाजगीकरणातुन सिटी गार्ड यांचे तर्फे 4 ट्रॅक्टर नाल्यांवर फवारणी करण्याकरीता आहेत एवढया यंत्रणेतुन डास निर्मुलनाचे काम करतात. फॉगीग नियमीत करायला नको. 15 दिवसात एकदा हाय रिस्क ऐरियामध्ये फॉंगीग करणे आवश्यक आहे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :फॉगीगची फवारणी दोन दोन महिणे केली जात नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** :ज्या ठिकाणी साथ आहे संशयित रूग्ण आहेत तिथे फॉगीग करायला पाहिजे. शहरामध्ये डेंग्युचा पॉझिटिव्ह रूग्ण एकही नाही. एप्रिल पासुन डेंग्युच्या संशयीत 58 केसेस आहे.

**मा.सभापती** :एका वार्डामध्ये एक कर्मचारी देण्यात यावा. सदरील कर्मचारी यांनी फवारणी केल्यावर संबधीत नगरसेवकांची स्वाक्षरी आणावी. 99 वार्डामध्ये 99 नगरसेवकांची स्टॅम्प,सही आणली जाते का? शासनाकडे 2006 पासून अनुदानित कर्मचाऱ्यांची बिले पाठविण्यात आलेली नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी** :बिले पाठविण्यात आली होती. त्यात काही ऑडिट ऑब्जेक्शन आले होते. ते करेक्ट करून पाठविण्यात आले आहे.

**मा.सभापती** :10 कोटी रूपये शासनाकडुन सदरील कर्मचाऱ्यांचे वेतनाचे येणे बाकी आहे. याबाबतीत शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा. 99 वार्डामध्ये 99 नगरसेवकांचे स्टॅम्प, सही घेण्यात यावी. कुठल्याही नगरसेवकांची तक्रार असता कामा नये. औषधांची फवारणी वार्डामध्ये वेळेवर करण्यात यावी.

**मा.सभापती** :

**<u>विषय क्र. 54 :</u>** **(विषय क्र. 50 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 21/09/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)**

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

**टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)**

**मा.सभापती : विषय स्थगीत करण्यांत येतो.**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 55 :**

**दिनांक 27/04/2011 (का.प.क्र.17), 29/04/2011 (का.प.क्र.18), 25/04/2012 (का.प.क्र. 01), 02/06/2012 (का.प.क्र.01), 06/06/2012 (का.प.क्र.02), 15/06/2012 (का.प.क्र.03), 25/06/2012 (का.प.क्र.04), 06/07/2012 (का.प.क्र.05) व 19/07/2012 (का.प.क्र.06) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

**श्री.गिरजाराम हळनोर : दिनांक 29.04.2011चे इतिवृत्त पान नंबर 23 वर विषय क्रमांक 275 बंजारा कॉलनी येथील गटार दुरूस्तीसाठी टेंडर मागविण्यात आले होते. 18,83,501 चे टेंडर आहे. यामध्ये तीन टेंडर आलेले होते. 5.81 चे बिलो होते. श्री.शेख कलीम 9.18 बिलो होता. अमन असोसिएट 10 टक्के जास्त होता. चुकून झ ाालेले आहे का? याबाबतची माहिती घेण्यात यावी.**

**मा.सभापती :नगर सचिव यांनी याबाबतची माहिती घेण्यात यावी व दुरूस्ती करण्यात यावी.**

**ठराव :**

दिनांक 29.04.2011 चे इतिवृत्त पान नंबर 23 वर विषय क्रमांक 275 बंजारा कॉलनी येथील गटार दुरूस्तीसाठी टेंडर मागविण्यात आले होते. 18,83,501 चे टेंडर आहे. यामध्ये तीन टेंडर आलेले होते. 5.81 चे बिलो होते. श्री.शेख कलीम 9.18 बिलो होता. अमन असोसिएट 10 टक्के जास्त होता. चुकून झालेले आहे का? याबाबत नगर सचिव यांनी माहिती घ्यावी व तशी दुरूस्ती करण्यांत यावी. यासह दिनांक 27/04/2011 (का.प.क्र.17), 29/04/2011 (का.प.क्र.18), 25/04/2012 (का.प.क्र. 01), 02/06/2012 (का.प.क्र.01), 06/06/2012 (का.प.क्र.02), 15/06/2012 (का.प.क्र.03), 25/06/2012 (का.प.क्र.04), 06/07/2012 (का.प.क्र.05) व 19/07/2012 (का.प.क्र.06) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. 56 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन 2012-13 या वर्षासाठी मो.जाफरगेट येथील आठवडी बाजार फि वसुली ठेका देण्यासाठी प्रथम दि.23/04/2012 रोजी काढलेल्या जाहिर निविदा / सूचनेमध्ये एक निविदा प्राप्त झाल्याने फेरनिविदा काढण्याच्या प्रशासकीय निर्णयानंतर जा.क्र.मनपा/मामअ/707/ 2012, दि.07/07/2012 फेरनिविदा प्रसिध्द करण्यांत आली असता खालील निविदाधारकांनी निविदा दाखल केल्या व प्राप्त निविदा दर खालीलप्रमाणे आहेत.

01. श्री.राजू त्र्यंबक खरात - रू.16000/-
02. श्री.मोहम्मद फारूख मो.उस्मान - रू.14500/-
03. श्री.किरण राजू बिडलॉन - रू.18000/-

या निविदामध्ये महानगरपालिकेने सदरील बाजारासाठी आधारभूत किमंत प्रती बाजार रू.27,830/- नमुद केली होती. प्राप्त निविदा दर हे आधारभूत किमंतीपेक्षा कमी असल्याने व फेरनिविदा व निविदा कालावधी इ. सह बाजाराचा विचार करता प्राप्त निविदा दरासंबंधाने उच्च दराचे निविदाधारकास वाटाघाटीस बोलविले असता श्री.किरण राजू बिडलॉन यांनी वाटाघाटीमध्ये रू.18800/- प्रती बाजार याप्रमाणे दर देण्याचे मान्य केले. यास प्रशासकीय मान्यता झाली असून नेहमीच्या अटी शर्तीनुसार निविदा रक्कमेच्या 25% रक्कम व 25% बँक गॅरंटी घेऊन निविदाधारक श्री.किरण राजू बिडलॉन यांना रक्कम रू.18800/- प्रती बाजार या दराने दि.31/03/2013 पर्यंत जाफरगेट आठवडी बाजार फी वसुली करण्यासाठी देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : आठवडी बाजाराचे टेंडर एक वर्षात काढले जाते, त्यानंतर त्यास सहा महिने, तीन महिने मुदतवाढ देण्यात येते. काही वेळेस ठेकेदार स्विकारतो काही वेळेस स्विकारत नाही. महानगरपालिकेच्या माध्यमातून वसुल करू परंतु महानगरपालिकेच्या माध्यमातून कशी वसुली होते याचे अनुभव पालिकेकडे आहेत. ऑडीटचे मालमत्ता विभागाबाबत आक्षेप येतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांना याची शिक्षा भोगावी लागते. या ज्या निविदा काढण्यात येतात त्या वर्षभरासाठी असल्यामुळे निविदा कालावधी संपण्याच्या अगोदर निविदा प्रक्रीया सुरू करत नाही. विनंती आहे की, कुठलेही बाजाराचा ठेका देत असतांना तो तीन वर्षासाठी देण्यात यावा. त्याचे अडीच वर्ष पुर्ण झाल्यानंतर निविदा प्रक्रीया चालू करावी म्हणजे कालावधी संपण्यापुर्वी नवीन निविदा प्रक्रीया पुर्ण होईल. जेणेकरून महानगरपालिकेने मध्ये वसुल करायचे किंवा परस्पर ठेकेदार वसुल करतो,

महानगरपालिकेला त्याची माहिती नसते. ती रक्कम मनपा फंडात जमा होत नाही. तीन वर्षाची निविदा 10 ते 15 टक्के नैसर्गिक वाढ दरवर्षी गृहीत धरून करण्यात यावी म्हणजे ऑडीटचा प्रश्न येणार नाही. ठरावात नमूद करावे की, अडीच वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर नवीन निविदा प्रक्रीया सुरू करण्यात यावी. यामुळे विभागात घडणाऱ्या गोष्टींना आळा बसेल. सदरील बाजाराचा ठेका तीन वर्षासाठी करावा व नैसर्गिक वाढ लक्षात घेऊन करावा. अडीच वर्षाचा कालावधी झाल्यावर नवीन निविदा प्रक्रीया सुरू करण्यात यावी.

**श्री.नारायण कुचे** : तीन वर्ष कालावधी करण्यात येऊन निविदा 10 ते 15 टक्के नैसर्गिक वाढ दरवर्षी गृहीत धरून प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

**मा.सभापती** : यापुर्वी कशा पध्दतीने निविदा काढत होतो?

**मालमत्ता अधिकारी** : बाजारासाठी दरवर्षी निविदा काढण्यात येते. त्याचप्रमाणे यावर्षी निविदा काढण्यात आलेली आहे.

**मा. सभापती** : निविदेचा कालावधी संपलेला आहे.

**मालमत्ता अधिकारी** : होय, आता जी निविदा काढण्यात आली आहे ती सहा महिन्यांसाठी आहे. दरवर्षी नैसर्गिक वाढ 10% धरण्यात येते.

**मा. सभापती** : मनपातर्फे वसुलीचे काम करण्यात येत होते. स.सदस्यांनी ज्या सूचना सभागृहासमोर मांडल्या आहेत. त्यानुसार प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे. दरवर्षी 10% वाढ करावी. तीन वर्षाचा कालावधी संपण्यापुर्वी सहा महिने अगोदर नवीन निविदा प्रक्रीया सुरू झाली पाहिजे. व्हेरीएशन, रिकॉल होऊ शकतो. एका निविदेचा कालावधी संपला की दुसरा सुरू झाले पाहिजे. या पध्दतीने अंमलबजावणी करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2012-13 या वर्षासाठी मो.जाफरगेट येथील आठवडी बाजार फि वसुली ठेका देण्याकरीता प्राप्त निविदानुसार उच्च दराचे निविदाधारक श्री.किरण राजू बिडलॉन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार नेहमीच्या अटी शर्तीनुसार निविदा रक्कमेच्या 25% रक्कम व 25% बँक गँरटी घेऊन निविदाधारक श्री.किरण राजू बिडलॉन यांना रक्कम रू.18800/- प्रती बाजार या दराने दि.31/03/2013 पर्यंत आठवडी बाजार फी वसुली करण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रतिवर्षी 10% नैसर्गिक वाढ गृहीत धरून निविदाधारक श्री.किरण राजू बिडलॉन यांना त्यापुढील दोन वर्षासाठी जाफरगेट आठवडी बाजार फी वसुली करण्यास आणि तीन वर्षाचा कालावधी संपण्यापुर्वी सहा महिने अगोदर नवीन निविदा प्रक्रीया सुरू करण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. आगाऊ रक्कम भरून घेण्यात यावी.

**<u>विषय क्र. 57 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुख्य अग्निशमन दल, पदमपुरा ईमारतीवर E.O.C. सेंटरसाठी अतिरिक्त मजल्यांची वाढ करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2011-12 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून रू.2,09,26,965/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता तसेच मा.सर्वसाधारण सभा दि.09/05/2012 ठराव क्र.759 अन्वये मान्यता प्राप्त आहे. सदर कामाकरीता प्रथम वेळे निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 4 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 4 निविदा प्राप्त झाल्या होत्या सदरील प्राप्त निविदासोबतचे दाखल फक्त कागदपत्रेच काढण्यात आली होती. तसेच नमुद

कामासाठी दाखल निविदा धारकांपैकी 03 निविदा धारकांनी त्यांच्या निविदा उघडण्यात येऊ नये असे लेखी पत्र दिले होते. परंतु संबंधीतांचा खुलासा योग्य नसल्याने व शासन निर्णय दि.02 जानेवारी 1992 नुसार एकच निविदा स्विकारणे योग्य नसल्याने सदरील कामाच्या प्रशासकीय मान्यतेअंती फेर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण 4 निविदा विक्री होऊन स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 3 निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-निविदा विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. श्री.अब्दुल कदीर शेख रहीम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19.19% जास्त दराने
2. श्री.एम.ए.सिध्दीकी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 22.78% जास्त दराने
3. मे.स्टार कंन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकीय दरापेक्षा 24.78% जास्त दराने

उपरोक्त प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री.अब्दुल कदीर शेख रहीम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 19.19% जास्त दराची होती. सदर प्राप्त दराच्या निविदेतील दराबाबत संबंधीत कंत्राटदारास नमुद दराबाबत प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलविण्यात आले असता, संबंधीत कंत्राटदाराने त्यांनी भरणा केलेल्या म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 19.19% जास्त दरापेक्षा आणखी कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 14.00% जास्त दरात सदर काम करणे बाबत लेखी पत्राद्वारे संमती दिली आहे. यास मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास मान्यता देवून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत शिफारस केली आहे.

तरी श्री.अब्दुल कदीर शेख रहीम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.00% जास्त दराच्या निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुख्य अग्निशमन दल, पदमपुरा ईमारतीवर E.O.C. सेंटरसाठी अतिरिक्त मजल्यांची वाढ करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.अब्दुल कदीर शेख रहीम यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा 14.00% जास्त दराने त्यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 58 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक 01/10/2012 ते 30/09/2013 या कालावधीसाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मालाचे वाहन आयात केलेल्या ठिकाणापासून निर्यात होणाऱ्या मार्गस्थ मालाच्या प्रती वाहनावर रहदारी फी (पारगमन शुल्क) रू.100/- (रू.शंभर फक्त) संकलन करण्यासाठी खाजगी अभिकर्ता नियुक्ती संदर्भाने चौथ्या वेळी निविदेची रक्कम अंतिम करण्यासाठी चार सदस्याची समिती दिनांक 15/09/2012 रोजीच्या मान्यतेनुसार आयुक्तांनी गठीत केल्यानुसार निविदा क्र.मनपा/ रहदारी फी/2012/326 दि.14/09/2012 अन्वये दि.16/09/2012 रोजीच्या वर्तमान पत्रात एकूण देकार रक्कम रूपये 18.23 कोटीची निविदा (चौथी वेळ) प्रसिध्द करण्यात आली होती. निविदेच्या नियोजीत कार्यक्रमानुसार दिनांक 29/09/2012 पर्यंत ई-टेंडरिंगद्वारे एकुण तीन (3) निविदांची विक्री झाली होती, त्यापैकी तीन्ही निविदा प्राप्त झाल्या आहेत. ई-टेंडरिंगद्वारे प्राप्त झालेल्या निविदा दिनांक 21/9/2012 रोजी दुपारी 3.30 वाजता निविदेतील तांत्रिक लिफाफा (Technical Bid) चार सदस्याच्या समिती समोर उघडण्यात आल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. मे.सहकार ग्लोबल लि., मालाड, मुंबई
2. मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर
3. मे.आदर्श इंटरप्राईजेस, औरंगाबाद

रहदारी फी (पारगमन शुल्क) वसुलीच्या अटी व शर्तीनुसार 1) मे.सहकार ग्लोबल लि., मालाड, मुंबई 2) मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर 3) मे.आदर्श इंटरप्राईजेस,

**औरंगाबाद यांनी निविदेतील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने सदरच्या तिन्ही एजन्सींचे ई-टेंडरींगद्वारे प्राप्त झालेले व्यापारी लिफाफा (Commercial Bid) दि.26/09/2012 रोजी दुपारी 1.30 वाजता चार सदस्याच्या समिती समोर उघडण्यात आले. ई-टेंडरिंगद्वारे उघडण्यात आलेल्या रहदारी फी (पारगमन शुल्क) च्या निविदेतील व्यापारी लिफाफा (Commercial Bid) मध्ये दर्शविलेल्या प्राप्त देकार रकमेचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.**

**रहदारी फी (पारगमन शुल्क) निविदेतील प्राप्त देकार रकमेचा तुलनात्मक तक्ता**

| अ.क्र. | एजन्सींचे नांव | एकूण देकार रक्कम |
|---|---|---|
| 1 | मे.सहकार ग्लोबल लि., मालाड, मुंबई | 13,05,00,000/- |
| 2 | मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर | 12,51,12,490/- |
| 3 | मे.आदर्श इंटरप्राईजेस, औरंगाबाद | 14,71,00,000/- |

**वरिल प्राप्त निविदांपैकी मे.आदर्श इंटरप्राईजेस, औरंगाबाद यांनी सर्वात जास्त (Highest Bid) म्हणजेच रक्कम रूपये 14,71,00,000/- (अक्षरी रूपये चौदा कोटी एकाहात्तर लाख फक्त) चा सर्वाधिक देकार दिलेला आहे. संबंधीत एजन्सी सोबत वाटाघाटी अंती रूपये 14,71,00,000/- ऐवजी दि.01/10/2012 ते 30/09/2013 या कालावधीसाठी रक्कम रूपये 15,01,00,000/- (अक्षरी - पंधरा कोटी एक लाख फक्त) पर्यंत वाढवून देण्याची लेखी संमती दिलेली आहे.**

**त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम -1949 च्या अनुसूचि-ड मधील प्रकरण-8 चे नियम-35 आणि कलम-147, कलम-466 (1) च्या (अ) मधील (फ) व उपकलम-2 मधील तरतुदींच्या अधिन राहून दिनांक 01/10/2012 ते 30/09/2013 या कालावधीसाठी सर्वाधिक (Highest Bid) देकार रक्कम देणारी मे.आदर्श इंटरप्राईजेस, औरंगाबाद यांना रहदारी फी (पारगमन शुल्क) संकलन करण्यासाठी रहदारी फी (पारगमन शुल्क) संकलन अभिकर्ता म्हणुन नियुक्त करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.**

**संवाद :**

**श्री.नारायण कुचे** :सदर विषयाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**मा.सभापती** :प्रशासनाने खुलासा करावा.

**प्र.उपआयुक्त(म)** :रहदारी फी वसुली करण्यासाठी दिनांक 15.07.2012 रोजी 30 दिवसांसाठी प्रथम वेळेस निवीदा प्रसिध्द करण्यात आली होती. निवीदेची किंमत 20 कोटी 95 लाख 45 हजार रूपये होती. 30 दिवसांच्या कालावधीसाठी राज्यस्तरीय वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. 30 दिवसांच्या कालावधीत कोणताही बीडर पुढे आला नाही.

**मा.सभापती** :पहिली निवीदा किती दिवसांसाठी काढण्यात आली.

**प्र.उपआयुक्त(म)** :30 दिवसांसाठी काढण्यात आली. प्रतिसाद न मिळाल्यामुळे शासन निर्णय 19 एप्रिल 2011 त्याच किंमतीवर 15 दिवसांची फेरनिवीदा प्रसिध्द केली. या कालावधीतही प्रतिसाद मिळाला नाही. 2 (10) नुसार सदर निवीदेची ऑफर प्राईझ फेर विचार करून तीसऱ्यावेळेस निवीदा प्रसिध्द करावी म्हणुन सूचना आहे. तिसऱ्या वेळेस सात दिवसांची निवीदा 18 कोटी 23 लाखाची काढली. या कालावधीमध्ये एकही निवीदा मिळालेली नाही. चौथ्या वेळेस 18.09. ची निवीदा प्रसिध्द केली. मनपाच्या निर्धारित किंमतीपेक्षा कमी किंमतीची निवीदा स्विकारणार नाही. ही अट चौथ्या वेळेस काढण्यात आली. समोरच्यांची ऑफरप्राईझ मागविण्यात आली. स्विकारणे किंवा नाकारणे यांचा संपुर्ण अधिकार मा.आयुक्त यांनी राखुन ठेवलेला आहे. या नंतर चौथ्या वेळेस निवीदा प्रसिध्द केली 3

बीडर आलेत. कोणार्क इन्फास्ट्रक्चर, सहकार ग्लोबल लि., आदर्श इंटरप्राईजेस, औरंगाबाद 21 तारखेला तीन निवीदा उघडण्यात आल्या. त्याची कर्मिशिअल बिड 26.09.2012 रोजी उघडण्यात आली. कोणार्क इन्फास्ट्रक्चर 12 कोटी 91 लाखाची बीड होती, सहकार ग्लोबल लि.,13 कोटी 05 लाख हाती आणि आदर्श इंटरप्राईजेस, औरंगाबाद 14 कोटी 71 लाख बीड होती. वाटाघाटी अंती आदर्श इंटरप्राईजेस यांनी 15 कोटी 01 लाख देण्याचे मान्य केले. यासाठी चार सदस्यीय कोर कमिटी मा.आयुक्त यांनी गठीत केली होती. समितीसमोर प्रकरण ठेवण्यात आले. मनपाची ऑफर आणि आलेली बीड यामध्ये 3 कोटी 22 लाखांचा फरक होता. मनपाच्या कर्मचाऱ्यांकडुन वसुली केली जावी. असा विचार आला होता यासाठी 120 कर्मचारी लागतील. एका वर्षासाठी स्टेशनरी व इतर प्रशासकीय खर्च 3.50 कोटी वर्षाकाठी लागतील. समितीने दोन्ही प्रस्ताव ठेवले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रशासनाने जी कमिटी नेमली होती त्यसमितीला हे सर्व मान्य आहे का?

प्र.उपआयुक्त(म) :कमिटीने प्रपोज केले आहे. दोन्ही मार्ग आपणाकडे आहे. स्वत: वसुल करायचे असेल तर 120 कर्मचारी लागतील. जेवढे जकातीसाठी कर्मचारीसंख्या लागत होती तेवढीच रहदारी वसुलीसाठी कर्मचारी लागतील. जकातमधील 58 कर्मचारी एलबीटीमध्ये काम करीत आहेत.

मा.सभापती :चारही वेळेस निवीदा काढत असतांना प्रशासनास किती खर्च आला.

प्र.उपआयुक्त(म) :जवळपास 10 लाख रूपये खर्च आला.राज्यस्तरीय वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आलेली आहे शासनाच्या अटीप्रमाणे एका इंग्रजी दैनिकामध्ये जाहिरात देण्यात आलेली आहे.त्याचाही खर्च आलेला आहे.

मा.सभापती :120 कर्मचारी कोठुन उपलब्ध करून देणार.

प्र.उपआयुक्त(म) :इतर विभागामधुन कार्यरत कर्मचाऱ्यांमधुन 120 कर्मचारी काढावे लागतील.

मा.सभापती :कर्मचाऱ्यांवर नियंत्रण कसे ठेवणार. कलेक्शन च्या ठिकाणाहुन विना पावत्या वाहने सोडल्यास त्यावर नियंत्रण कसे ठेवले जाणार.

प्र.उपआयुक्त(म) :निश्चित असे सांगता येणार नाही. परंतु असे होण्याची शक्यता आहे.

मा.सभापती :कलेक्शन होत नव्हते म्हणुन जकात खाजगीकरणाकडे जावे लागले. मुदत केव्हा पर्यंत आहे.

प्र.उपआयुक्त(म) :30 सप्टेंबरपर्यंत रात्री 12 वाजेपर्यंत मुदत आहे. प्रशासनाने तीन महिण्यांपासून कार्यवाही सुरू केलेली आहे.

मा.सभापती :कमिटीमध्ये कोण कोण होते.

**प्र.उपआयुक्त(म)** **:कमिटीमध्ये चार सदस्य होते. मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाधिकारी, विधी अधिकारी आणि (मी स्वत:) उपआयुक्त(म)**

**मा.सभापती** **:विषय मंजूर करण्यात येतो.**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक 01/10/2012 ते 30/09/2013 या कालावधीसाठी औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मालाचे वाहन आयात केलेल्या ठिकाणापासून निर्यात होणाऱ्या मार्गस्थ मालाच्या प्रती वाहनावर रहदारी फी (पारगमन शुल्क) रू.100/- (रू.शंभर फक्त) संकलन करण्यासाठी खाजगी अभिकर्ता नियुक्ती संदर्भाने प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.आदर्श इंटरप्राईजेस, औरंगाबाद यांनी सर्वात जास्त (Highest Bid) म्हणजेच रक्कम रूपये 14,71,00,000/- (अक्षरी रूपये चौदा कोटी एकाहात्तर लाख फक्त) चा सर्वाधिक देकार दिलेला असल्याने संबंधीत एजन्सी सोबत झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार रक्कम रूपये 15,01,00,000/- (अक्षरी - पंधरा कोटी एक लाख फक्त) सर्वाधिक (Highest Bid) देकार रक्कम देणारी मे.आदर्श इंटरप्राईजेस, औरंगाबाद यांना रहदारी फी (पारगमन शुल्क) संकलन करण्यासाठी रहदारी फी (पारगमन शुल्क) संकलन अभिकर्ता म्हणुन नियुक्त करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 59 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सहा वार्ड कार्यालयाच्या कक्षेतील अस्तित्वातील ड्रेनेज लाईनवरील तसेच खुल्या गटारीवरील SFRC ढापे टाकण्याची सतत मागणी होत असते. विद्यमान ड्रेनेज यंत्रणा सुस्थितीत ठेवणे, गटारीमध्ये दुर्गंधी व अपघात होऊ नये यासाठी SFRC ढापे टाकणेची आवश्यकता आहे. यासाठी मनपाचे एकुण सहा वार्ड कार्यालयासाठी एकत्रितरित्या गोल व चौकोनी विविध आकारातील SFRC कव्हर्स पुरवठा करणेसाठी रू.49,99,500/- चे अं.प. हे यापूर्वीच्या सन 2008-2009 च्या मंजुर दराप्रमाणे असून त्यास आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिलेली आहे व प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी शिफारस केली आहे.

सदर कामासाठी अर्थसंकल्प 2012-2012 मध्ये पान क्र.E-81 अ.क्र.38 वर आर.सी.सी./ गोल व चौकोनी ढापे खरेदी करणे अंतर्गत तरतुद करण्यात आली आहे.

करीता प्रस्तावित साहित्य पुरवठा करण्याचे काम अं.प. रक्कम रू.49,99,500/- चा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे समोर मंजुरी व विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 59 ते 61 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सहा वार्ड कार्यालयाच्या कक्षेतील अस्तित्वातील ड्रेनेज लाईनवरील तसेच खुल्या गटारीवरील ढापे टाकणे आवश्यक असल्याने गोल व चौकोनी विविध आकारातील एकुण सहा वार्ड कार्यालयासाठी एकत्रितरित्या SFRC कव्हर्स पुरवठा करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.49,99,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 60 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.विश्वनाथ एस.नाटकर, वरिष्ठ लिपीक (सेवानिवृत्त) हे सेवेत कार्यरत असतांना त्यांना स्वत:च्या Joint Replacement साठी अग्रिम रू.1,50,000/- (अक्षरी रू. एक लाख पन्नास हजार मात्र) मंजूर करण्यांत आलेले आहे.

त्यानुषंगाने सदर अग्रिमाचे समायोजन करण्यासाठी संबंधीतांनी प्रथम सादर केलेल्या वैद्यकीय देयक रक्कम रू.2,39,478/- पैकी नियमानुसार अनुज्ञेय रक्कम रू.2,20,963/- च्या 90 % रक्कम रू.1,98,867/- (अक्षरी रू.एक लाख अठ्ठ्याण्णव हजार आठशे सदुसष्ठ मात्र) त्यापैकी एकूण दाखल केलेल्या देयकाच्या 5% रक्कम रू.11,974/- (अक्षरी रू.अकरा हजार नऊशे चौऱ्याहत्तर मात्र) मनपा फंडात जमा करून, त्यांना उर्वरित रक्कम रू.1,86,893/- (अक्षरी रू.एक लाख शहांशी हजार आठशे त्र्यान्नव मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत व संबंधीताने पुन्हा दुसऱ्यांदा सादर केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी नियमानुसार अनुज्ञेय रक्कम रू.18,432/- च्या 90% रक्कम रू.16,589/- (अक्षरी रू. सोळा हजार पाचशे एकोन्नव्वद मात्र) त्यापैकी एकूण दाखल केलेल्या देयकाच्या 5% रक्कम रू.922/- (अक्षरी रू.नऊशे बावीस मात्र) मनपा फंडात जमा करून, त्यांना उर्वरित रक्कम रू.15,667/- (अक्षरी रू.पंधरा हजार सहाशे सदुसष्ट मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबत, (रू.1,86,893+ रू.15,667/- असे एकुण रू.2,02,560/-) एवढ्या वैद्यकीय खर्चामधून अग्रिम रक्कम

**रू.1,50,000/- वजा जाता, उर्वरित रक्कम रू.52,560/- (अक्षरी रू.बावन्न हजार पाचशे साठी मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देवून अदा करण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री. विश्वनाथ एस. नाटकर, वरिष्ठ लिपीक (सेवानिवृत्त) हे सेवेत कार्यरत असतांना त्यांना स्वतःच्या Joint Replacement साठी केलेल्या र.रू.1,86,893+ रू.15,667/- असे एकुण रू.2,02,560/- एवढ्या वैद्यकीय खर्चामधून अग्रिम रक्कम रू.1,50,000/- वजा जाता, उर्वरित रक्कम रू.52,560/- (अक्षरी रू.बावन्न हजार पाचशे साठी मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास व सदरची उर्वरीत रक्कम संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**विषय क्र. 61 :**

**औरंगाबाद महानगरपालिकेचे विविध विभागातील अभिलेखांचे Scanning, Digitization, Indexing करून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे 1) Sify Technical Ltd. 2) Datamatics Global Services Ltd. यांच्या सोबत Rate Contract असून संबंधीतापैकी M/s Datamatics Global Services Lmtd यांनी औरंगाबाद महानगरपालिकेसाठी कमर्शिअल प्रपोजल दिले आहे. त्यानुसार Digitization व Scanning साठीचे दर पुढील प्रमाणे.**

| Sr.No. | Page Size | Rate Contract cost per Image (excluding taxes) | No of pages |
|---|---|---|---|
| 1 | A 4 | 0.72 | 1 Cr.Apporx. |
| 2 | Legal | 0.72 | |
| 3 | A 3 | 1.44 | |

**Data Entry & Indexing साठी रू.9500/- प्रति ऑपरेटर प्रति महा किंवा रू.0.36 / per image याप्रमाणे दर दिले आहे.**

**Scanning & files च्या संदर्भात शासन परिपत्रक क्र.मातस/2072/प्र.क्र.241/39 दिनांक 2 जुलै 2012 नुसारच्या परिशिष्टमध्ये Data Entry करिता विभागाने स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे अथवा प्रति ऑपरेटर प्रति महिना रू.9219/- रेट कॉन्ट्रक्ट असलेल्या एजन्सीकडून ऑपरेटर उपलब्ध करून घ्यावे असे नमुद करण्यांत आले आहे. करीता महानगरपालिकेकडून Data Entry ऑपरेटर उपलब्ध होत नसल्यास संबंधीत Datamatics Global Services Ltd. यांच्या सोबत वाटाघाटीकरून दर निश्चित करण्यांत येईल.**

**औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध विभागाचे Scanning व Digitization चे काम पहिल्या टप्प्यात रू.1,05,20,000 च्या मर्यादेपर्यंत करण्यांत येईल.**

**सदर Scanning व Digitization चे काम संबंधीत Rate Contract एजन्सीकडून Indexing करून घेणे, एजन्सीला अभिलेखे उपलब्ध करून देणे, Scanning व Digitization झाल्यानंतर एजन्सीकडून कागदपत्रे परत घेणे, तसेच एजन्सीला Rate Contract प्रमाणे आवश्यक ती मदत करण्याची जबाबदारी संबंधीत शाखा / विभाग प्रमुखांची राहील. ते नोडल अधिकारी म्हणुन काम करतील.**

**करिता वरील नमुद विविध विभागातील अभिलेख्यांचे Digitization & Scanning व Indexing M/s Datamatics Global Services Ltd. या एजन्सीकडून शासनमान्य दरात काम करून घेणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे विविध विभागातील अभिलेखांचे Scanning, Digitization, Indexing करून घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे Rate Contract प्रमाणे M/s Datamatics Global Services Ltd. यांनी औरंगाबाद महानगरपालिकेसाठी कमर्शिअल प्रपोजल दिल्यानुसार महानगरपालिकेच्या विविध विभागातील अभिलेख्यांचे Digitization & Scanning व Indexing चे काम M/s Datamatics Global Services Ltd. या एजन्सीकडून शासनमान्य दरात करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**